सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

**विधि व न्याय विभाग**

**सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५**

# महाराष्ट्र नागरी क्षेत्रामध्ये गुरे पाळणे आणि त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम, १९७६

( दिनांक २ सप्टेंबर, २००६ पर्यंत सुधारित )

**Maharashtra Act No. XLV of 1976**

# The Maharashtra Keeping and Movement of Cattle in Urban Areas (Control) Act, 1976

( *As modified upto 2nd September 2006* )

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांनी भारतात मुद्रित केले आणि संचालक, शासकीय मुद्रण लेखनसामग्री व प्रकाशन, महाराष्ट्र शासन, मुंबई ४०० ००४ यांनी प्रकाशित केले.

२००६

[ किंमत : रु. ४.०० ]

# महाराष्ट्र नागरी क्षेत्रामध्ये गुरे पाळणे आणि त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम, १९७६

## अनुक्रमणिका


उद्देशिका.

कलमे.

१. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

२. व्याख्या.

३. लायसनशिवाय नागरी क्षेत्रांमध्ये गुरे न पाळणे.

४. लायसनांचे दोन वर्ग.

५. लायसने देणे व त्यांचे नवीकरण.

६. लायसन निलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकार.

७. नागरी क्षेत्रात गुरांच्या आयातीस प्रतिषेध.

८. अपिले.

९. लायसन देणारा अधिकारी आणि अपील प्राधिकरण यांचे आदेश अंतिम असणे.

१०. गुरे पाळण्यासाठी प्रतिषिद्ध क्षेत्रे.

११. जागेमध्ये प्रवेश करण्याचा आणि निरीक्षण करण्याचा अधिकार.

१२. दंडाधिकाऱ्यासमोर गुरे आणण्यासाठी बंधपत्र घेण्याचा अधिकार.

१३. अपराध व शास्ती.

१४. कंपन्यांकडून करण्यात येणारे अपराध.

१५. द्रव्यदंडाच्या शिक्षेसंबंधात विशेष तरतूद.

१६. अपराधांची संक्षिप्त न्याय चौकशी करण्याचा अधिकार.

१७. सद्हेतूने केलेल्या कारवाईस संरक्षण.

१८. नियम.

१९. सूट.

२०. अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे, परंतु विद्यमान स्थानिक प्राधिकरण कायद्यांबरोबरच हा अंमलात असेल.

२१. निरसन व व्यावृत्ती.

# सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४५[1]

## [ महाराष्ट्र नागरी क्षेत्रामध्ये गुरे पाळणे व त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम, १९७६ ]

राष्ट्रपती यांची संमती मिळाल्यानंतर **महाराष्ट्र शासन राजपत्र,** भाग-४, असाधारण, दिनांक २० सप्टेंबर, १९७६ यात प्रथम (इंग्रजीत) प्रसिद्ध करण्यात आला.

(२० सप्टेंबर, १९७६)

या अधिनियमात पुढील अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आली :—

सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३* (२९ एप्रिल, १९७७)†

**महाराष्ट्र राज्याच्या नागरी क्षेत्रांमध्ये गुरे पाळणे आणि त्यांची ने-आण करणे यासाठी लोकहितार्थ लायसन देणे आणि त्या गोष्टींचे विनियमन करणे किंवा त्यास प्रतिषेध करणे, यासाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** नागरी क्षेत्रांमध्ये आरोग्य व स्वच्छता राहील याबद्दल खातरजमा करून घेणे आवश्यक आहे आणि नागरी क्षेत्रांमध्ये दुभती गुरे मोठ्या संख्येत पाळल्यामुळे आरोग्यास व स्वच्छतेस धोका निर्माण होत आहे ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्याच्या नागरी क्षेत्रांमध्ये गुरे पाळणे व त्यांची ने-आण करणे, यासाठी लोकहितार्थ लायसन देणे आणि त्या गोष्टींचे विनियमन करणे किंवा त्यास प्रतिषेध करणे, यासाठी आणि त्यांच्याशी संबद्ध अशा बाबींकरिता तरतूद करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी** भारतीय गणराज्याच्या सत्ताविसाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र नागरी क्षेत्रांमध्ये गुरे पाळणे आणि त्यांची ने-आण करणे (नियंत्रण) अधिनियम, १९७६, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू आहे.

(३) राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील [2]अशा दिनांकास हा अधिनियम प्रथम बृहन्मुंबईमध्ये आणि ठाणे जिल्ह्याचा जो भाग बृहन्मुंबईस लागून आहे व ठाणे आणि वसईच्या खाडीद्वारे सीमित झालेला आहे, त्या भागामध्ये अंमलात येईल. राज्य शासनास, ते **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे विनिर्दिष्ट करील अशा इतर नागरी क्षेत्रामध्ये किंवा क्षेत्रांमध्ये किंवा त्यांच्या भागांमध्ये आणि अशा दिनांकापासून किंवा तारखांपासून हा अधिनियम अंमलात आणता येईल; आणि भिन्नभिन्न नागरी क्षेत्रांकरिता किंवा त्यांच्या भागांकरिता भिन्नभिन्न दिनांक विनिर्दिष्ट करता येतील.

व्याख्या.

**२.** संदर्भानुसार, अन्यथा अपेक्षित नसेल तर, या अधिनियमात,—

(क) '' अपील प्राधिकरण '' याचा अर्थ, राज्य शासनाने **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ज्यात हा अधिनियम अंमलात आलेला असेल अशा कोणत्याही नागरी क्षेत्राकरिता किंवा त्याच्या भागाकरिता अपील प्राधिकरण म्हणून नियुक्त केलेला अधिकारी किंवा प्राधिकरण, असा आहे;

---

[1] उद्देश व कारणे यांच्या निवेदनासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७६, भाग पाच, असाधारण, पृष्ठ २७२-२८० (इंग्रजी) पहा.

[2] १ ऑक्टोबर, १९७६, **महाराष्ट्र शासन राजपत्र,** १९७६, भाग-चार-ब, असाधारण, पृष्ठ ८७० (इंग्रजी) यामध्ये प्रसिद्ध केलेली शासकीय अधिसूचना, कृषि व सहकार विभाग, क्रमांक डब्ल्यूएफपी-१९७६-२३४२३-७-एडीएफ, दिनांक २९ सप्टेंबर, १९७६ पहा.

*सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३ अन्वये सन १९७७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक तीन निरसित करण्यात आला.

†ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

(ख) '' गुरे '' याचा अर्थ, अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेली सर्व किंवा कोणतीही गुरे, असा आहे ;

(ग) '' गृहस्थ '' याचा अर्थ, कोणतीही जागा स्वतःचे निवासस्थान म्हणून ताब्यात ठेवणारी व्यक्ती, असा आहे ;

(घ) '' निरीक्षक '' या याचा अर्थ, लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याने, ज्यात हा अधिनियम अंमलात आलेला असेल अशा कोणत्याही नागरी क्षेत्राकरिता किंवा त्याच्या भागाकरिता निरीक्षक म्हणून नियुक्त केलेला किंवा केलेले, एक किंवा अधिक अधिकारी, असा आहे ;

(ङ) '' लायसन '' याचा अर्थ, या अधिनियमाखाली दिलेले लायसन, असा आहे ;

(च) '' लायसन देणारा अधिकारी '' याचा अर्थ, राज्य शासनाने ज्यात हा अधिनियम अंमलात आलेला असेल अशा कोणत्याही नागरी क्षेत्राकरिता किंवा त्याच्या भागाकरिता, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे लायसन देणारा/देणारे अधिकारी म्हणून नियुक्त केलेला/केलेले एक किंवा अधिक अधिकारी, असा आहे ;

(छ) गृहस्थाच्या संदर्भात '' कुटुंबातील व्यक्ती '' याचा अर्थ, पती/पत्नी, वडील, आई, मुले, नोकर आणि गृहस्थाबरोबर एकाच निवासस्थानामध्ये राहणारे इतर नातेवाईक (कोणतेही असल्यास), असा आहे ;

(ज) '' परवाना '' याचा अर्थ, या अधिनियमाखाली देण्यात आलेला परवाना, असा आहे ;

(झ) '' विहित '' याचा अर्थ, नियमाद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(ञ) '' नियम '' याचा अर्थ, या अधिनियमाखाली केलेले नियम, असा आहे ;

(ट) '' नागरी क्षेत्र '' याचा अर्थ,—

(एक) बृहन्मुंबई आणि ठाणे जिल्ह्याचा जो भाग बृहन्मुंबईला लागून आहे व ठाणे आणि वसईच्या खाडीने सीमित झालेला आहे, तो भाग, यांचा समावेश असलेले क्षेत्र ;

(दोन) त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये रचना केलेल्या कोणत्याही महानगरपालिकेच्या किंवा नगरपालिकेच्या सीमांच्या आतील कोणतेही क्षेत्र आणि राज्य शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी त्याच नागरी क्षेत्राचा भाग असल्याचे घोषित करील, अशा क्षेत्राच्या लगतचे क्षेत्र ;

(तीन) एखाद्या क्षेत्राचा विकास व वाढती लोकसंख्या विचारात घेऊन, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी नागरी क्षेत्र असल्याचे घोषित करील असे राज्यातील इतर कोणतेही क्षेत्र, असा आहे.

लायसन शिवाय नागरी क्षेत्रांमध्ये गुरे न पाळणे.

**३.** कोणत्याही नागरी क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागांमध्ये हा अधिनियम अंमलात आल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर कोणतीही व्यक्ती, या अधिनियमान्वये तिला दिलेल्या लायसनच्या शर्तीखाली आणि त्यानुसार असेल ते खेरीज करून, त्या क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये कोणतीही गुरे पाळणार नाही किंवा पाळण्याची व्यवस्था करणार नाही किंवा पाळण्यास परवानगी देणार नाही.

लायसनांचे दोन वर्ग.

**४.** (१) लायसनांचे पुढीलप्रमाणे दोन वर्ग असतील :—

(क) मुख्यत्त्वेकरून, स्वतःच्या किंवा आपल्या कुटुंबातील व्यक्तीच्या उपयोगासाठी दूध मिळावे म्हणून एखाद्या गृहस्थाने स्वतःच्या जागेत पाळलेल्या गुरांच्या बाबतीत त्यास दिलेले लायसन :

परंतु, कोणत्याही गृहस्थास, तीन पेक्षा जास्त गुरांच्या बाबतीत, असे लायसन दिले जाणार नाही ;

(ख) दुग्धव्यवसायी किंवा दूध विक्रेता म्हणून धंदा चालवण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीने पाळलेल्या गुरांच्या बाबतीत तिला दिलेले लायसन.

(२) पोट-कलम १ च्या खंड (क) आणि (ख) मध्ये निर्दिष्ट केलेल्या लायसनांना अनुक्रमे वर्ग 'अ' चे लायसन आणि 'ब' चे लायसन असे संबोधण्यात येईल.

**५.** (१) वर्ग 'अ' किंवा वर्ग 'ब' चे लायसन मिळवण्याचा किंवा त्याचे नवीकरण करण्याचा उद्देश, असणारी कोणतीही व्यक्ती, विहित नमुन्यात आणि विहित रीतीने लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याकडे अर्ज करील. अशा अर्जावर दोन रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक लावलेला असेल आणि विहित लायसन फी त्या सोबत असेल. लायसने देणे व त्यांचे नवीकरण.

(२) असा अर्ज मिळाल्यावर, लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याला, त्याला योग्य वाटेल अशी, चौकशी केल्यानंतर, लायसन देता येईल किंवा त्याचे नवीकरण करता येईल, किंवा अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी, लायसन देण्याचे किंवा त्याचे नवीकरण करण्याचे आदेशाद्वारे नाकारता येईल.

(३) लायसन देताना किंवा त्याचे नवीकरण करताना किंवा लायसन देण्याचे किंवा त्याचे नवीकरण करण्याचे नाकारताना, लायसन देणारा अधिकारी, इतर गोष्टीबरोबरच पुढील बाबी लक्षात घेईल :—

(क) त्या वस्तीमध्ये पाळण्यात आलेल्या गुरांची संख्या ;

(ख) ज्या क्षेत्रामध्ये गुरे पाळण्याचे प्रस्तावित केले, त्या क्षेत्राची योग्यता ;

(ग) तबेल्याची योग्यता आणि पिण्यासाठी, धुण्यासाठी आणि साफसफाईसाठी तबेल्यामध्ये असलेल्या पाणीपुरवठ्याची व्यवस्था ;

(घ) वासरांच्या योग्य पालनपोषणाची व्यवस्था ;

(ङ) भाकडपणाच्या कालावधीमध्ये गुरांच्या पालनाची व्यवस्था ;

(च) या बाबतीत विहित केलेल्या इतर कोणत्याही बाबी.

(४) लायसन विहित नमुन्यात असेल, आणि ते या अधिनियमाच्या आणि नियमांच्या तरतुदींच्या अधीन असेल आणि ते विहित कालावधीसाठी वैध राहील.

**६.** जिला लायसन देण्यात आले आहे, अशा कोणत्याही व्यक्तीने या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे किंवा लायसनच्या कोणत्याही शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर केली आहे असे लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याला सकारण वाटत असेल अशा बाबतीत, त्या व्यक्तीला कारण दाखवण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, अभिलिखित करावयाच्या कारणांसाठी, त्या अधिकाऱ्यास आदेशाद्वारे ते लायसन निलंबित किंवा रद्द करता येईल. लायसन निलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकार.

**७.** लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगीने आणि लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याने त्या व्यक्तीस दिलेल्या परवान्याच्या शर्तीखाली आणि त्यानुसार असेल त्याखेरीज, ज्यात हा अधिनियम अंमलात आलेला आहे, अशा नागरी क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये कोणतीही व्यक्ती, अशा क्षेत्राच्या किंवा त्याच्या भागाच्या बाहेरील कोणत्याही ठिकाणाहून, कोणतीही गुरे आणणार नाही : नागरी क्षेत्रात गुरांच्या आयातीस प्रतिषेध.

परंतु, त्या क्षेत्रामध्ये, त्या क्षेत्राच्या स्थानिक प्राधिकरणाने किंवा शासनाने चालविलेल्या किंवा लायसन दिलेल्या कोणत्याही कत्तलखान्यामध्ये कत्तलीच्या प्रयोजनासाठी आणलेल्या कोणत्याही गुरांच्या बाबतीत किंवा कोणत्याही बाहेरील क्षेत्राच्या त्यांच्या प्रवासाच्या मार्गामध्ये त्या क्षेत्रामधून जाणाऱ्या कोणत्याही गुरांच्या बाबतीत अशा परवानगीची किंवा परवान्याची आवश्यकता असणार नाही.

**८.** (१) लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याच्या, लायसन देण्यास किंवा त्याच्या नवीकरण करण्यास नकार देणाऱ्या किंवा लायसन निलंबित किंवा रद्द करणाऱ्या किंवा ज्यात हा अधिनियम अंमलात आलेला आहे त्या नागरी क्षेत्रात किंवा त्याच्या भागात गुरांची आयात करण्यास परवानगी किंवा परवाना देण्यास नकार देणाऱ्या आदेशामुळे कोणतीही व्यक्ती व्यथित झाली असेल तर, त्या व्यक्तीला त्या आदेशाविरुद्ध अपील प्राधिकरणाकडे विहित रीतीने अपील दाखल करता येईल. या कलमाखालील प्रत्येक अपिलावर दहा रुपयांचा न्यायालय फी मुद्रांक लावलेला असेल, आणि त्या आदेशाविरुद्ध अपील दाखल करण्यात आले आहे त्या आदेशाची सूचना अपीलकाराला ज्या दिनांकास मिळाली असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, असे अपील दाखल करण्यात येईल : अपिले.

परंतु योग्य मुदतीत अपील दाखल करण्यास प्रतिबंध होण्यास अपीलकाराला पुरेसे कारण होते, याबाबत; अपील प्राधिकरणाची खात्री पटल्यास, उपरोक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतरसुद्धा अपील प्राधिकरणाला कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारता येईल.

(२) असे कोणतेही अपील मिळाल्यावर, अपील प्राधिकरणाला आवश्यक असेल अशी चौकशी केल्यानंतर आणि अपीलकाराला स्वतःची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटतील असे आदेश देता येतील.

(३) पोट-कलम (१) अन्वये अपील दाखल करण्यात आले असेल अशा बाबतीत, अपील प्राधिकरणाला त्याला योग्य वाटेल अशा कालावधीसाठी आणि अशा शर्तीवर लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याच्या आदेशाची अंमलबजावणी स्थगित ठेवता येईल.

लायसन देणारा अधिकारी आणि अपील प्राधिकरण यांचे आदेश अंतिम असणे.

९. लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याने दिलेला प्रत्येक आदेश, अपील प्राधिकरणाकडील अपीलाच्या अधीन राहून अंतिम असेल, आणि अशा अपिलावर अपील प्राधिकरणाने दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल आणि कोणताही दावा आणि इतर कार्यवाही यामध्ये त्यावर आक्षेप घेतला जाणार नाही; आणि या अधिनियमाद्वारे किंवा त्याखाली त्यांना प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याने किंवा अपील प्राधिकरणाने दिलेल्या किंवा द्यावयाच्या कोणत्याही आदेशाच्या संबंधात किंवा त्यांनी केलेल्या किंवा करावयाच्या कोणत्याही कृतीच्या संबंधात, कोणत्याही न्यायालयाकडून, न्यायाधिकरणाकडून किंवा इतर प्राधिकरणाकडून स्थगनादेश किंवा निषेधाज्ञा देण्यात येणार नाही.

गुरे पाळण्यासाठी प्रतिषिद्ध घोषित क्षेत्रे.

१०. (१) या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही नागरी क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये हा अधिनियम ज्या दिनांकास अंमलात आला असेल त्या दिनांकानंतर केव्हाही राज्य शासनाला लोकहितार्थ तसे करणे योग्य वाटले तर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे ते संपूर्ण क्षेत्र किंवा तो भाग किंवा त्या क्षेत्रातील एक एक भाग प्रतिषिद्ध क्षेत्र असल्याचे घोषित करता येईल.

(२) असे क्षेत्र घोषित केल्याच्या दिनांकास आणि त्यानंतर त्या प्रतिषिद्ध क्षेत्रातील कोणत्याही जागेच्या बाबतीत वर्ग 'ब' चे लायसन देण्यात येणार नाही; आणि प्रतिषिद्ध क्षेत्रातील जागेच्या बाबतीत, असे कोणतेही लायसन पूर्वीच देण्यात आले असेल आणि ते अंमलात असेल तर, उक्त दिनांकापासून ६ महिन्यांचा किंवा त्या लायसनचा उर्वरित कालावधी संपल्यानंतर यापैकी जे आधी घडेल तेव्हा, ते रद्द झालेले असेल; आणि संबंधित व्यक्ती, लायसन रद्द झाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीत आपली सर्व गुरे प्रतिषिद्ध क्षेत्रामधून जेथे हा अधिनियम अंमलात आलेला नसेल अशा दुसऱ्या कोणत्याही क्षेत्रामध्ये हलवील.

[1][ (३) पोट-कलम (१) आणि (२) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासनास, कोणत्याही वेळी, लोकहिताच्या दृष्टीने **राजपत्रातील** त्या अधिसूचनेद्वारे त्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या संपूर्ण क्षेत्राच्या किंवा त्याच्या कोणत्याही भागाच्या संबंधात, त्याने पोट-कलम (१) अन्वये काढलेली कोणतीही अधिसूचना विखंडित करता येईल आणि कोणत्याही वेळी, पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेसारख्याच अधिसूचनेद्वारे, आणि अशा नंतरच्या अधिसूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून ते क्षेत्र किंवा त्याचा भाग प्रतिषिद्ध क्षेत्र म्हणून पुन्हा घोषित करता येईल.]

जागेमध्ये प्रवेश करण्याचा आणि निरीक्षण करण्याचा अधिकार.

११. कोणताही निरीक्षक किंवा लायसन देणारा अधिकारी किंवा अपील प्राधिकरण किंवा लायसन देणाऱ्या अधिकाऱ्याने, अपील प्राधिकरणाने किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी, किंवा उप निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेला कोणताही पोलीस अधिकारी, यांना पुढील कारणांसाठी कोणत्याही वाजवी वेळी, जेथे हा अधिनियम अंमलात आला आहे, त्या नागरी क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये असलेल्या कोणत्याही तबेल्यात किंवा इतर जागेत किंवा प्रवेश करता येईल व त्याचे निरीक्षण करता येईल :—

(क) ज्याच्या बाबतीत लायसन मिळण्यासाठी किंवा त्याच्या नवीकरणासाठी अर्ज करण्यात आला आहे किंवा लायसन देण्यात आले आहे, अशी कोणतीही गुरे किंवा ती पाळण्यासाठी केलेली व्यवस्था याची पाहणी करण्यासाठी ; किंवा

---

[1] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २ अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

(ख) लायसन किंवा परवाना याशिवाय किंवा या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या इतर कोणत्याही तरतुदींचा किंवा लायसनच्या किंवा परवान्याच्या शर्तीचा भंग करून, कोणतीही गुरे त्या ठिकाणी ठेवण्यात, किंवा यथास्थिती, आणण्यात येतात असे त्याला सकारण वाटत असल्यास, ती तशी ठेवण्यात किंवा यथास्थिती आणण्यात येतात किंवा कसे याबद्दल खात्री करून घेण्यासाठी.

दंडाधिकाऱ्यासमोर गुरे आणण्यासाठी बंधपत्र घेण्याचा अधिकार.

**१२.** कोणत्याही गुराच्या बाबतीत, या अधिनियमाखाली अपराध करण्यात आला आहे असे उप निरीक्षकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या एखाद्या पोलीस अधिकाऱ्याला सकारण वाटत असेल अशा बाबतीत, त्याला जिने असा अपराध केला आहे असे त्याला वाटत असेल त्या व्यक्तीला आपण तिच्याविरुद्ध दंडाधिकाऱ्याकडे तक्रार करीत असल्याचे कळविता येईल आणि त्यास तक्रार निकालात निघेपर्यंत वेळोवेळी जेव्हा जेव्हा आवश्यक असेल तेव्हा तेव्हा ती दंडाधिकाऱ्यासमोर गुरे अशा अर्थाचे दोन जामीनदार असलेले बंधपत्र देण्याचा निदेश त्या व्यक्तीला देता येईल.

अपराध व शास्ती.

**१३.** (१) जी कोणतीही व्यक्ती,—

(क) कलम ३ किंवा ७ यांच्या तरतुदींचे उल्लंघन करील ; किंवा

(ख) जे क्षेत्र प्रतिषिद्ध घोषित केले असेल अशा कोणत्याही क्षेत्रामध्ये किंवा त्याच्या भागामध्ये लायसनशिवाय गुरे ठेवील किंवा तिचे लायसन रद्द झाल्यावर कलम १०, पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे गुरे हलविण्याच्या बाबतीत कसूर करील ;

अशा व्यक्तीचा अपराध सिद्ध झाल्यानंतर ३ वर्षेपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची शिक्षा किंवा द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये नमूद करावयाचे तद्‌विरुद्ध विशेष आणि पुरेसे कारण नसल्यास, असा कारावास तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही किंवा द्रव्यदंड दोन हजार रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

(२) एखाद्या व्यक्तीवर या कलमाखाली एखादा अपराध सिद्ध झाला असेल तेव्हा, ज्यांच्या संबंधात अपराध घडलेला आहे अशी सर्व किंवा कोणतीही गुरे राज्य शासनाकडे सरकारजमा होतील असा आदेश सुद्धा,—

(क) पोट-कलम (१) च्या खंड (क) खालील तो पहिलाच अपराध असेल तर, अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या न्यायालयास देता येईल.

(ख) उक्त खंड (क) खाली केलेल्या अपराधानंतर लगेच सहा महिन्यांच्या आत केलेला दुसरा अपराध असेल किंवा पोट-कलम (१), खंड (ख) खाली केलेला पहिलाच किंवा दुसरा अपराध असेल. तर, अपराधाची न्यायचौकशी करणाऱ्या न्यायालयास देता येईल.

(३) या कलमाखाली प्रत्येक अपराध हा, दखली व जमानती योग्य अपराध असेल.

कंपन्यांकडून करण्यात येणारे अपराध.

**१४.** (१) या अधिनियमाखाली अपराध एखाद्या कंपनीकडून करण्यात आला असेल तेव्हा, अपराध घडला त्यावेळी कंपनीचे कामकाज चालविण्यासाठी कंपनीची जी प्रभारी असेल आणि जी कंपनीस जबाबदार असेल अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच कंपनी या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानन्यात येईल व तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व तद्‌नुसार शिक्षा दिली जाण्यास ती पात्र असेल :

परंतु, अपराध आपल्या नकळत घडलेला आहे असे किंवा असा अपराध होऊ नये म्हणून आपण सर्व यथोचित दक्षता घेतली होती असे त्या व्यक्तीने सिद्ध केले तर, या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे ती व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा कोणत्याही कंपनीकडून, या अधिनियमाखालील कोणताही अपराध घडला असेल आणि असा अपराध त्या कंपनीच्या कोणत्याही संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या संमतीने किंवा त्यांनी कानाडोळा केल्यामुळे झाला आहे किंवा त्या कंपनीच्या संचालकाच्या, व्यवस्थापकाच्या, सचिवाच्या किंवा इतर अधिकाऱ्याच्या हयगयीमुळे तो घडला आहे असे सिद्ध झाले तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा अधिकारी यांच्याविरुद्ध कार्यवाही करण्यात येईल व तद्‌नुसार त्याला शिक्षा होईल.

**स्पष्टीकरण** : या कलमाच्या प्रयोजनांसाठी,---

(क) '' कंपनी '' याचा अर्थ, कोणताही निगमनिकाय, असा आहे; व त्यात एखादी भागीदारी संस्था किंवा व्यक्तींचा इतर संघ यांचा समावेश होतो; आणि

(ख) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात, '' संचालक '' याचा अर्थ, भागीदारी संस्थेचा भागीदार, असा आहे.

द्रव्यदंडाच्या शिक्षेसंबंधात विशेष तरतूद.

**१५.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याच्या कलम २९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील, एखाद्या अपराध जिच्यावर सिद्ध झाला असेल, अशा कोणत्याही व्यक्तीवर त्या कलमात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आर्थिक दंडाच्या मर्यादेपेक्षा जास्त द्रव्यदंडाची शिक्षा कोणत्याही महानगर दंडाधिकाऱ्याने किंवा प्रथम दर्जाच्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याने सुनावणे हे विधिसंमत असेल. १९७४ चा २.

अपराध्याची संक्षिप्त न्याय चौकशी करण्याचा अधिकार.

**१६.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम २६० पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या अपराधाची संक्षिप्त न्यायचौकशी करण्याचा त्या वेळेपुरता अधिकार प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास, अभियोग पक्षाने यासंबंधात अर्ज केला असता, या अधिनियमानुसार शिक्षापात्र असलेल्या कोणत्याही अपराधाची न्यायचौकशी उक्त संहितेची कलमे २६२ ते २६५ मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार करता येईल. १९७४ चा २.

सद्हेतूने केलेल्या कारवाईस संरक्षण.

**१७.** या अधिनियमाखाली, सद्हेतूने केलेल्या किंवा करण्याचे योजिलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल राज्य शासनाच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा या अधिनियमाखाली नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही प्राधिकरणाच्या विरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा विधिविषयक इतर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

नियम.

**१८.** (१) या अधिनियमाखाली नियम करण्याचे अधिकार हे राज्य शासनाकडून **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे वापरण्यात येतील.

(२) या अधिनियमात इतरत्र असलेल्या नियम करण्याच्या कोणत्याही अधिकारास बाध न येऊ देता, राज्य शासनास, या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या बाबींपैकी कोणत्याही बाबींच्यासंबंधास फी आकारण्यासाठी व सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असतील असे नियम करता येतील.

(३) या अधिनियमाखाली करण्यात आलेले सर्व नियम हे पूर्वप्रसिद्धीच्या शर्तीच्या अधीन असतील.

(४) या अधिनियमाखाली करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा अधिक अधिवेशनात, एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन समाप्त होण्यापूर्वी त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा नियम करू नये म्हणून दोन्ही सभागृहे सहमत होतील व असा निर्णय **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम अशी अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून अशा फेरबदल केलेल्या स्वरुपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिती, येणार नाही. तथापि, असे कोणतेही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

सूट.

**१९.** (१) या अधिनियमातील कोणताही मजकूर शासनाच्या मालकीच्या किंवा जेथे हा अधिनियम अंमलात आला असेल अशा नागरी क्षेत्राच्या किंवा त्याच्या भागाच्या स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या गुरांना व शैक्षणिक किंवा संशोधनाच्या प्रयोजनांसाठी पाळण्यात आलेल्या किंवा पांजरपोळ किंवा तत्सम संस्थेत बाळगलेल्या कोणत्याही गुरांना लागू होणार नाही.

(२) राज्य शासनास लोकहितार्थ तसे करणे आवश्यक वाटत असेल तर, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कोणत्याही व्यक्तीस किंवा व्यक्तींच्या वर्गास किंवा जेथे हा अधिनियम अंमलात आला असेल अशा कोणत्याही नागरी क्षेत्रातील किंवा त्याच्या भागातील सर्वसामान्य जनतेला, त्या बाबतीत विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा शर्तीस अधीन राहून, या अधिनियमाच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदीपासून गुरांच्या सर्व किंवा कोणत्याही वर्गाच्या संबंधात सूट देता येईल आणि कोणत्याही वेळी, तशाच आदेशाद्वारे अशी सूट निलंबित किंवा रद्द करता येईल.

**२०.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी व नियम हे, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात किंवा कोणत्याही करारात (स्पष्ट असो किंवा गर्भित असो), रुढी किंवा वहिवाट यात, त्यांच्याशी विसंगत असे काहीही असले तरी, अंमलात येतील. अधिनियमाचा अधिभावी प्रभाव असणे, परंतु विद्यमान स्थानिक प्राधिकरण कायद्याबरोबरच हा अंमलात असेल.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदीस अधीन राहून, या अधिनियमाच्या तरतुदी महानगरपालिका, नगरपालिका किंवा जेथे हा अधिनियम अंमलात आला असेल अशा कोणत्याही नागरी क्षेत्राच्या किंवा त्याच्या भागांच्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाशी संबंधित कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या बरोबरीने व त्याचे महत्त्व कमी न करता अंमलात येतील.

१९५८ चा मुंबई ६२. **२१.** हा अधिनियम **राजपत्रात** प्रसिद्ध होईल त्या दिनांकास मुंबई आवश्यक वस्तू व गुरे (नियंत्रण) अधिनियम, १९५८ व त्याखाली देण्यात आलेले कोणतेही आदेश या अधिनियमाच्या अनुसूचित विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या गुरांच्या बाबतीत वर उल्लेखिलेल्या दिनांकापूर्वी, त्या अधिनियमान्वये किंवा त्या आदेशान्वये केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या संबंधात असेल ते खेरीज करून, लागू असण्याचे बंद होतील; त्या प्रयोजनासाठी तो अधिनियम पुढीलप्रमाणे सुधारित झालेला असेल :— निरसन व व्यावृत्ती.

त्या अधिनियमाच्या, अनुसूची, भाग-दोन मधील नोंदी १ व ३ ते ६ (दोन्ही धरून) या वगळण्यात येतील.

## अनुसूची

(कलम २ चा खंड (ख) व कलम २१ पहा)

१. म्हशी.

२. गाई.

३. कालवडी.

४. वासरे.

५. वळू.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई